अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १५.०४.२०२५ | अंक नं. १३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Air Strike Offer
स्पोकन इंग्लिश कोर्स फक्त रु. २४००/- (कालावधी अडीच महिने)
फ्रि स्टडी मटेरियल सहित हायस्कुल इंग्रजी ग्रामर कोर्स
१७ एप्रिल पासुन नवीन बॅचेस सुरु अगदी मोजक्याच जागा
फक्त रु. २०००/- (कालावधी २ महिने)
निवृत्त स्कार्डन लिडर (एअरफोर्स) प्रशांत रेखी सर यांची
गेल्या २१ वर्षांपासुन अहिल्यानगरमध्ये
पिनॅकल करिअर अॅकडमी
शाखा नं.१ : रोनक सेंटर, भिस्तबाग चौक, सावेडी, अ.नगर.
शाखा नं.२ : डी.एड. कॉलेज जवळ, समर्थ सिटी स्कॅन समोर, सातभाई मळा, दिल्ली गेट, अ.नगर
त्वरीत संपर्क साधा :- Mob. : 9423461807, 9422462933

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेत वादग्रस्त निर्णय देणारा 'तो' पंच ठरला दोषी

## आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच नितीश काबलिये यांना तीन वर्षांसाठी केले निलंबित : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची कारवाई



पुणे – आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच नितीश काबलिये यांना तीन वर्षांसाठी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सहभागास बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्यावतीने ही कारवाई करण्यात आली. अहिल्यानगर येथे झालेल्या ६७ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत एका सामन्यात नितीश काबलिये यांनी वादग्रस्त निर्णय घेतला होता. या निर्णयाबाबत एक समिती स्थापन करून चौकशी करण्यात आली होती. या चौकशीत काबलिये यांना दोषी ठरवण्यात आले. त्यामुळे त्यांना आता तीन वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

याबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने नितीश काबलिये यांना पत्र पाठवण्यात आले आहे. पत्रात म्हटले की, २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान अहिल्यानगरच्या वाडीयापार्क येथे ६७ वी वरीष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा झाली. या कुस्ती स्पर्धेमध्ये गादी विभागातील महाराष्ट्र केसरी वजनगटातील अंतिम फेरीमध्ये पै. पृथ्वीराज मोहोळ व पै. शिवराज राक्षे यांच्या कुस्तीस आपण गादीवर मुख्य पंच म्हणून काम करत होता. कुस्ती दरम्यान आपण दिलेल्या चितपटीच्या निकालावरून प्रचंड गोंधळ झाला, पै. शिवराज राक्षे याने तुम्ही दिलेल्या निर्णयावर नाराज होऊन पंचांना मारहाण केली. पंचांना झालेल्या मारहाणीबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडून पै. शिवराज राक्षेवर शिस्तभंगाची कारवाई करत ३ वर्षाची स्पर्धा सहभाग बंदी घालण्यात आली.

आपण दिलेल्या चितपटीच्या निर्णयावरून महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रामध्ये प्रचंड संभ्रमाचे वातावरण तयार झाले व उलट सुलट चर्चा होऊ लागल्या. हे सर्व बाबींचे आवलोकन करून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष विलास कथुरे यांच्या अध्यक्षतेखाली सदर कुस्तीच्या निर्णयाबाबत एक चौकशी समिती स्थापन केली होती. चौकशी समितीचे प्रमुख विलास कथुरे यांनी चौकशी समितीचा अहवाल २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघास सादर केला.

सदर अहवालामध्ये आपणास दोषी धरण्यात आले असल्याने आपल्यावर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडून ३ वर्षांसाठी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सहभागास बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आपणास याबाबत आपणास आपले मत मांडायचे असल्यास पुढील ७ दिवसांमध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघास लेखी स्वरूपात आपले मत मांडावे, असे संघाचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी या पत्रात म्हटले आहे.

संकष्ट चतुर्थी उपवासासाठी स्पेशल टक्कर
बुधवार दि.१६ एप्रिल चंद्रोदय ०९.४५ मी.
काजु- पॅटीस, शाबुदाणा वडा,
कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी

अकौंटंट पाहिजे
टॅलीचे ज्ञान आवश्यक आकर्षक पगार+ पी.एफ, मेडिक्लेम, इन्शुरन्स सुविधा उपलब्ध.
(कमीत कमी ३ ते ५ वर्षांचा अनुभव आवश्यक)
प्रॉम्प्ट टूलिंग इंडिया प्रा.लि.
ऋणानुबंध अपार्टमेंट, फेज-२, गुलमोहररोड, सावेडी, अहिल्यानगर
9765111511,9922233900



LOKMANYA ORTHOPAEDICS
अरुणोदय
PIONEER AND LEADER IN ROBOTIC ASSISTED KNEE REPLACEMENT
लोकमान्य हॉस्पिटल, पुणे
सुपरस्पेशालिटी ओपीडी
गुडघ्यावरील उपचार, तेही रोबोटिकच्या सहाय्याने
आपण या वेदनांनी त्रस्त आहात का?
➤ गुडघेदुखी - सांधेदुखी
➤ खुब्याचे विकार
➤ लिगामेंट इंज्युरी
➤ पायाला बाक येणे
➤ मांडी घालताना त्रास होणे
➤ चालताना त्रास होणे
➤ खेळात होणाऱ्या दुखापती
➤ मणक्याचे आजार
आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध सांधेरोपण तज्ञ
डॉ.नरेंद्र वैद्य
यांची OPD अहिल्यानगरमध्ये (अ. नगर)
शनिवार, दिनांक 19 एप्रिल 2025 वेळ : सकाळी. 8:30 ते 10:30 वा
स्थळ: अरुणोदय सुपरस्पेशलिटी हॉस्पिटल, इम्पीरियल चौक, पुणे बस स्टॅंडजवळ, स्टेशन रोड, अहिल्यानगर (अ. नगर)
9673859185/ 9922888735

# कुत्रा भुंकला म्हणून त्याला जीवे ठार मारले

## नगरमधील एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल, बोल्हेगाव परिसरात घडलेली घटना

नगर – रस्त्याने जाताना कुत्रा भुंकला म्हणून एकाने त्याला झाडाच्या फांदीने निर्दयीपणे मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी होवून त्या कुत्र्याचा मृत्यू झाल्याची घटना बोल्हेगाव येथील राघवेंद्र स्वामी मंदिराच्या पाठीमागे १४ एप्रिलला रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी सचिन मंजाबापू कोहक (रा. राघवेंद्र स्वामीनगर, फेज २, बोल्हेगाव) यांच्याविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत प्राणीमित्र सुमित संतोष वर्मा (वय ३४, रा. माणिकनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, ते व त्यांचे मित्र हर्षद कटारिया हे दोघे १४ एप्रिल रोजी रात्री रस्त्यावरील मोकाट कुत्र्यांना खायला टाकत जात असताना बोल्हेगावच्या राघवेंद्र स्वामी मंदिराच्या पाठीमागे त्यांना लोकांची गर्दी दिसली. तेव्हा दोघे तेथे गेले व तेथील लोकांना विचारले असता लोकांनी त्यांना सांगितले की, सचिन मंजाबापू कोहक या इसमाने एका कुत्र्याला झाडाच्या फांदीने डोक्यावर व तोंडावर मोठ्या प्रमाणात मारहाण केली. त्यामुळे या मारहाणीत कुत्रा मरण पावला आहे.

त्यांनी परिसरात पाहिले असता तेथे त्यांना एक कुत्रा मेलेला दिसला. त्या कुत्र्याच्या तोंडातून व कानातून रक्त आलेले दिसले. त्यावेळी त्यांनी मारहाण करणाऱ्या व्यक्तीला 'कुत्र्याला मारहाण का केली?' असे विचारले असता, त्याने 'आपण रस्त्याने जात असताना तो कुत्रा आपल्या अंगावर भुंकला म्हणून त्याला मारहाण केली' असल्याचे सांगितले.

त्यानंतर वर्मा यांनी डायल ११२ ला कॉल करून तोफखाना पोलिसांना माहिती दिली. तसेच पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी सचिन मंजाबापू कोहक यांच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१) (आय) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



आमचे लाडके युवा नेते
नजरेत साठवून ठेवावं, आणि हृदयातशी जपावं असं सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व...
मा.श्री. धनंजय विष्णुशेठ फुलसौंदर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
वैष्णव मित्र मंडळ
नक्षत्र प्रतिष्ठान
बुरुडगांव रोड, अहिल्यानगर.



अहिल्यानगर मधील सर्वोत्तम चाट / प्रिमियम क्वालिटी मिठाई
* मिठाई * नाष्टा * चाट
३ किलोमीटरच्या अंतरावरील होम डिलिव्हरी १० मिनिटात
ओम स्विटस
* ब्रँच - दौलत हाईट्स, पुणेरी अमृततुल्य शेजारी, चाणक्य चौक, अहिल्यानगर
* मेन ब्रँच - गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
आयुष खंडेलवाल - 8169595041 | दिपक खंडेलवाल - 9423793012



Grant Medical Foundation
Ruby Hall Clinic
मोफत तपासणी शिबीर
पुण्यातील सुप्रसिध्द डॉक्टर तुमच्या भेटीला आता अहमदनगरमध्ये
डॉ. केदार पाटील
कन्सल्टंट बॅरिएट्रिक आणि लॅपरोस्कोपिक सर्जन
बुधवार, दिनांक: १६ एप्रिल २०२५ दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत
विशेष प्राविण्य
• बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया
• लॅपरोस्कोपीक आणि जटिल हर्निया शस्त्रक्रिया
• वजन कमी करण्यासाठी शस्त्रक्रियेव्यतिरिक्त उपचार पध्दती
• प्रगत लॅपरोस्कोपीक शस्त्रक्रिया
• पोटाचे विकार व कर्करोग
* ठिकाण *
साई एशियन हॉस्पिटल, विराज इस्टेट, तारकपूर बस स्टॉप समोर, तारकपूर, अहमदनगर-४१४००१
नाव नोंदणी करिता संपर्क : ९९२१००८९१९
सर्वप्रथम येणाऱ्यास नाव नोंदणीसाठी प्राधान्य

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे प्रतिपादन; जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'चे उदघाटन

नगर - जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात कृषी विभागाने पाणी वापर संस्थांसोबत समन्वय साधून पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक पद्धतीत बदल घडवून आणण्यावर भर द्यावा आणि सर्व विभागांनी मिळून पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले.

नागरिकांना पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देण्याबरोबरच जलसाक्षरता वाढीसाठी जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान आयोजित जलव्यवस्थापन कृती पंधरवडाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेट्ये, संतोष सांगळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे आदी उपस्थित होते.



'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' चा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात सर्व शासकीय विभागांचा सहभाग अपेक्षित आहे. सर्वांनी समन्वयाच्या माध्यमातून उद्दिष्टानुसार कार्यक्रमाचे योग्य व्यवस्थापन करावे. तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांचाही यात सहभाग घ्यावा.

जिल्ह्याला उन्हाळ्यात पाणी समस्येला सामोरे जावे लागते. शेतीसाठी पाणी आवश्यक असताना जिल्ह्याच्या विविध भागात पाण्याचे असमान वितरण आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाण्याचे महत्व पटवून द्यावे लागेल. जिल्ह्यात गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार आणि जलयुक्त शिवार योजना प्रभाविपणे राबविण्यात येत आहे. प्रमुख नद्यांचे पुनरूज्जीवन लोकसहभागातून करण्याचा प्रयत्न करावा लागेल.

स्थानिक स्वराज्य संस्थांना पाण्याचे महत्व समजावणे आणि गावातील पाण्याचे बजेट तयार करणे गरजेचे आहे. पाण्याची कमतरता असताना पाणी उपचारावरही भर देण्यात यावा. सर्व विभागांनी केवळ १५ दिवस उपक्रम न राबविता वर्षभर निश्चित उद्दिष्ट समोर ठेऊन नियोजनावर भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

श्री. शेट्ये म्हणाले, पाण्याचे स्त्रोत मर्यादित असून पाण्याची मागणी वाढते आहे. ही तफावत दूर करून पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, बिगर सिंचनाच्या पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने जल व्यवस्थापन कृती आराखडा घरोघरी पोहोचविण्यासाठी हा उपक्रम रबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावपातळीवर पोहोचून पाण्याशी निगडित नागरिकांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करावा. पाणी व्यवस्थापनाचे नवे तंत्र, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर याबाबत जागरूकता निर्माण करावी लागेल. पाण्याचे मोल सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

श्री. सांगळे म्हणाले, अन्न ही सजीवांची मूलभूत गरज असून त्यासाठी जमीन आणि पाणी आवश्यक आहे. पाण्यासाठी निसर्गावर अवलंबून राहावे लागते. पाण्यावर सर्व सजीवांचा हक्क आहे. मात्र माणसाने विकासासोबत पाण्याचा अनिर्बंध वापर सुरू केल्याने पाण्याचे संकट निर्माण झाले, अनेक समस्या निर्माण झाल्या. त्या दूर करण्यासाठी पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. यात शासनाच्या विविध विभागांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. जलसंपदा विभागामार्फत या कालावधीत जलजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. बोराळे म्हणाले, जिल्ह्यातील बहुतांशी जनता शेती व्यवसायावर आधारित आहे. त्यांच्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. पाणी हे जीवन असल्याने त्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व जाणून घ्यायला हवे. शेतीसाठी योग्य सिंचनाची सुविधा निर्माण होणे तेवढेच महत्वाचे आहे. त्यादृष्टीने स्रोताचे योग्य व्यवस्थापन आणि त्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. गायसमुद्रे म्हणाले, भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी पाण्याचे महत्व समजून घेण्याची आणि जलसंवर्धन करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने जलसंधारण विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रकल्पातील गाळ काढणे, जलयुक्त शिवार २.०, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना आदी उपक्रम राबविण्यात येतात. पाण्याचे महत्व नागरिकांना सांगण्यासाठी गावापातळीवर प्रयत्न करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

प्रस्ताविकात कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. पाण्याची उपलब्धता, नियोजन, पाण्याची बचत याबाबत जनजागृती करण्यासाठी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाभरात येत्या १५ दिवसात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच 'जलसंपदा आपल्या गावी' या उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांच्या समस्या गावातच दूर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आमदार संग्राम जगताप यांच्या संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. कार्यक्रमपूर्वी जिल्ह्यातील सहा नद्यांचे जल असलेल्या कलशाचे पूजन करण्यात आले, तसेच उपस्थितांनी जलप्रतिज्ञा घेतली. पंधरवड्यानिमित्त जनजागृती करणाऱ्या चित्ररथाचा शुभारंभ डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.





**जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त जल जागृती पोस्टरचे अनावरण**

जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त जल जागृती पोस्टरचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, हरिभूमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, भारतीय जैन संघटनेचे आदेश चंगेडिया आदी. (छाया - लहू दळवी)




**आकाशवाणी केंद्राला ३४ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल स्नेहबंधतर्फे सत्कार**

आकाशवाणी केंद्राला ३४ वर्षे पूर्ण झाली यानिमित्त 'स्नेहबंध'तर्फे डॉ. उद्धव शिंदे यांनी मोईन शेख, सुदाम बटुळे व सर्वांचा सन्मान केला. समवेत अभिजित ढाकणे, बालाजी वल्लाल, तुषार मेघळे.

## प्रेरणादायी अक्षरधन...







### मनरे... तू काहे ना धीर धरे...

मनात अनेक गोष्टी अशा असतात की, त्या कोणाबरोबरही बोलता येत नाही. त्या गोष्टी नक्की कुठल्या असतात? खरं तर त्या समजत नाहीत. एक मात्र खरं, त्या मनामध्ये तरंगतच असतात. एकावर एक म्हणा अथवा एकाखाली एक. त्या मनातच असतात. आता मन म्हटलं की आणखी एक गोंधळ.. तोही मनात. ज्यामध्ये हे मन आहे ते शरीर, म्हणजं माझं शरीर आले. मग त्या शरीराचे नाव, आडनाव आलं. वडिलांचे (पतीचे) नाव आले.

त्या शरीराची उंची, वजन, रंग, वय, जात आली. तर अगदी राहण्याचा पत्ता, नातेवाईक, मित्रमंडळी, नोकरी वा व्यवसाय अशा लांबलचक यादीचं शेपूट आलं. ही यादी घेऊन रूटीन आलं. एवढं सारं घेऊन जे माझं शरीर व त्याच्या आत तरंगणारं मन, जे दिसत नाही फक्त जाणवल्यासारखं वाटतं, त्याच्या विषयीचाच हा माझा गोंधळातला प्रश्न आहे.

आता काही समजलं नाही तर प्रश्न उभे राहतात मी म्हणतोय तसं, काही समजतच नाही तर प्रश्न येतात. अशा गोष्टी असतात की, त्या केवळ असल्यासारख्या वाटतात. त्या एक्झॅक्ट कुठल्या न कळल्यामुळे काही बोलता येत नाही. तुम्ही काय बोलणार? अन् कशावर?

मी जे बोलतोय ते तत्त्वज्ञान वगैरे नाही. भावनाप्रधान मन मग ते कुणाचंही असो, सतत अस्वस्थ राहत असेल काय? मन मारूनच राहात असेल का? अशा या मनाला म्हणावे तरी काय? तो अर्ध्या रात्रीसुद्धा महकतो, बऱ्याचदा बहकतो म्हणूनच सहा दशकांपूर्वीचं ते गाणं आजही प्रसिद्ध व गुणगुणावंसं वाटतं - 'मन रे तू काहे ना धीर धरे...'

## वैभव भिंगारे याचे आकस्मात निधन



नगर - शहरातील मंगल गेट हवेली येथील रहिवासी वैभव मनोज भिंगारे (वय २७) याचे १४ एप्रिल रोजी सायंकाळी आकस्मात निधन झाले. त्याच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत वैभव याच्या पश्चात आई, वडील, तीन चुलते, चुलत्या, एक बहीण व मेहुणे असा परिवार आहे

## राजेंद्र सुतार यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - येथील सुतार गल्लीतील रहिवासी राजेंद्र दत्तात्रय सुतार (वय ६०) यांचे १५ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. भिंगार अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. अविनाश सुतार यांचे ते वडील होत.

## दशरथ मुदगल यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील गाडगीळ पटांगण नालेगाव येथील रहिवासी दशरथ जनार्दन मुदगल (वय ८२) यांचे १३ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांचे ते चुलत भाऊ तर बाबासाहेब मुदगल यांचे चुलते होत.

## सुशीलाबाई साळवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - निलक्रांती चौकातील रहिवासी सुशिलाबाई भिमराव साळवे (वय ७६) यांचे १० एप्रिल रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अरविंद, चेतन, आनंद साळवे यांच्या त्या मातोश्री होत.

## रमणलाल गुजराणी यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीरामपूर न.प.चे माजी उपनगराध्यक्ष रमणलाल झुंबरलाल गुजराणी (वय ७१) यांचे हृदयविकाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

गुजराणी प्रोव्हिजन व माय चॉईस सुपर बाजारचे मालक सुमतीलाल गुजराणी यांचे धाकटे बंधू, धनंजय, गणेश, जितेंद्र, अमित व कमलेश गुजराणी यांचे चुलते, वैभव व विशाल गुजराणी यांचे वडील होत.

# धर्माधिकारी मळा येथील फ्लॅटमधून चोरी; सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास

नगर - कामानिमित्त बाहेरगावी गेलेल्या कुटुंबियाच्या बंद फ्लॅटचे कडी कोयंडा कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक करुन बेडरुम मधील कपाटातील दीड तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. ही घटना सावेडी परिसरातील धर्माधिकारी मळा येथील सुमन सुधा अपार्टमेंट येथे १२ ते १४ एप्रिल दरम्यान घडली.

याबाबत मित्रविंदा दयानंद कलेढोणकर (वय ६५, रा सुमन सुधा अपार्टमेंट, धर्माधिकारी मळा सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १२ एप्रिल रोजी काही कामानिमित्त नाशिक येथे गेल्या होत्या. त्याच दिवशी त्यांचा मुलगा व सून नात, नातू हे सुट्टी असल्याने पुणे येथे गेले होते. १४ एप्रिल रोजी सायंकाळी फिर्यादी या नाशिकहून घरी आल्या असता त्यांना त्यांच्या घराच्या दरवाजाचे लॉक दिसले नाही. दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. त्यांनी दरवाजा उघडून पाहणी केली असता घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

बेडरूम मधील कपाटाचा दरवाजा उघडा दिसला तसेच कपाटाचे सर्व साहित्य बेडवर अस्ताव्यस्त पडलेले दिसले. यावरुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरामध्ये चोरी केल्याची त्यांची खात्री झाली. त्यांनी कपाटात पाहणी केली असता त्यांची दीड तोळ्याचे सोन्याचे गोट व चार हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज मिळून आला नाही. यावरुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याच्या दागिन्यासह रोकड चोरुन नेली असल्याची त्यांची खात्री पटली. याप्रकरणी मित्रविंदा कलेढोणकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार प्रमिला गायकवाड या करीत आहेत.

# शेतातील बांधाच्या वादावरुन चौघांकडून माय लेकास मारहाण

नगर - शेतात कांदे काढण्याचे काम करीत असलेल्या माय लेकास चौघांनी शेतीच्या बांधाच्या वादातून शिवीगाळ, दमदाटी करीत लोखंडी टॉमी व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना नगर तालुक्यातील बाराबाभळी येथील कापसे मळा येथे १४ एप्रिल रोजी सकाळी घडली.

याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सोनू रावसाहेब वाघस्कर (वय २८, रा. कापसेमळा, बारा बाभळी ता. नगर) यांनी दिलेले फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हा त्याच्या आईसह शेतात कांदे काढत असताना तुषार अण्णा कापसे याने शेतीच्या बांधाच्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लोखंडी टॉमीने फिर्यादीच्या डोक्यात मारुन दुखापत केली. तसेच यावेळी विशाल अण्णा कापसे, सौरभ विठ्ठल कापसे व विठ्ठल माधव कापसे (सर्व रा. बारा बाभळी, ता.नगर) यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी फिर्यादीची आई भांडण सोडविण्याकरता मध्ये आली असता तिलाही हाताने मारहाण करण्यात आली. यावेळी फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचा ओम तसेच फिर्यादीचे आईच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र तोडून नुकसान केले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सोनू वाघस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला पुढील कारवाई सहायक फौजदार अकोलेकर करीत आहेत.

# निंबळक बायपास रोडलगत आढळला तरुणाचा मृतदेह

### घातपात झाल्याचा प्राथमिक अंदाज, पोलिसांकडून तपास सुरु

नगर - निंबळक चौक ते कल्याण बायपास रस्त्यादरम्यान निंबळक शिवारात एका अनोळखी तरूणाचा (वय अंदाजे ३५) मृतदेह आढळून आला आहे. सदर तरूणाचा घातपात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी दिली.

निंबळक शिवारात १४ एप्रिलला दुपारी रस्त्याच्या कडेला एक वाटसरू लघुशंकेसाठी थांबल्यानंतर त्याला एक मृतदेह दिसला. त्याने याची माहिती पोलिसांना दिली. सुरूवातीला तोफखाना पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र सदरचा मृतदेह एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत असल्याने काही वेळाने एमआयडीसी पोलिसही घटनास्थळी आले. मृतदेह सात ते आठ दिवसापूर्वीच घटनास्थळी टाकला असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली. शरीरावर किरकोळ जखमा आढळून आल्या आहेत. पोलिसांनी रूग्णवाहिकेतून मृतदेह येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात पाठविला. पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेहाचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे कारण समोर येणार आहे. सदर अनोळखी तरूणाची ओळख अद्याप पटलेली नाही. त्याची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर आले.

दरम्यान, खून करून मृतदेह बायपास रस्त्यावर आणून टाकले जात असल्याचे प्रकार घडत आहे. मागील माहिन्यात नगर शहरातील उद्योजक दीपक परदेशी यांचा देखील खून करून मृतदेह निंबळक बायपास शिवारात आणून टाकला होता. आताही याच परिसरात मृतदेह आढळून आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत डीजे लावल्याप्रकरणी पाच मंडळांवर गुन्हा

नगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीमध्ये विनापरवाना डीजे सिस्टीम लावून कर्ण कर्कश आवाजात मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण करून सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व नियमाचे उल्लंघन करणाऱ्या पाच मंडळाविरुद्ध तोफखाना पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

या कारवाईमध्ये नीलक्रांती चौक येथील नीलक्रांती मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित उत्तम घाटविसावे (रा. निलक्रांती चौक), डी जे चालक मालक भारत तानाजी मांढेकर (रा. चांदे, मुळशी, पुणे), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मित्र मंडळ सावेडी मंडळाचे अध्यक्ष सौरभ रवींद्र भिंगारदिवे (रा. सावेडी अ.नगर), डीजे चालक मालक प्रमोद राजू काळे (रा. बेळगाव, कर्नाटक), कॅम्प कौलारू मित्र मंडळ सर्जेपुरा मंडळाचे अध्यक्ष विनीत पाडळे (रा. कॅम्प कौलारू, सर्जेपुरा), डी जे मालक अक्षय बापू लावंड (रा. चंदननगर, पुणे), मिलिंद तरुण मंडळ मंगलगेटचे अध्यक्ष आदेश शरद साळवे (रा. मंगलगेट, अ.नगर), डी जे मालक छोटू ज्ञानदेव क्षीरसागर (रा. मंगलगेट, अ.नगर), सिद्धार्थ नगर मित्र मंडळ सिद्धार्थ नगर अ.नगरचे अध्यक्ष अभिषेक कांबळे (रा. सिद्धार्थनगर अ.नगर), डीजे मालक देविदास खंडू कर्डिले (रा. कडा, आष्टी, जिल्हा बीड), यांचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३, १५ व ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'हद्दपार' असतानाही नगरमध्ये आल्याने कोतवाली पोलिसांनी दोघा जणांना पकडले

नगर - उपविभागीय दंडाधिकारी यांचे हद्दपारीचा आदेश असताना विनापरवानगी शहरात येवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत वावरणाऱ्या दोघांवर कोतवाली पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई १४ एप्रिल रोजी रात्री दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान कापड बाजार, भिंगारवाला चौक येथे केली.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकी दरम्यान कोतवाली पोलिसांना शहरातील भिंगारवाला चौक येथे हद्दपार असलेला जावेद बिलाल शेख (वय ४०, रा. पांचपीर चावडी, अ.नगर) हा वावरताना मिळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन हद्दपारीबाबत खात्री केली असता त्यास उपविभागीय दंडाधिकारी नगर विभाग यांनी १४ एप्रिल पहाटे एक ते १५ एप्रिल सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान नगर शहराच्या हद्दीत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत जावेद शेख यास नोटीस बजावली असतानाही त्याने उपविभागीय दंडाधिकारी यांची कोणतीही लेखी परवानगी न घेता शहर हद्दीमध्ये बेकायदा फिरताना मिळून आला.

तसेच दुसऱ्या कारवाईत कापडबाजार येथील कोहिनूर कापड दुकानासमोर मिरवणुकीमध्ये हद्दपार असलेला करण कृष्णा फसले (वय ३२ रा. संगम चौक, खिस्त गल्ली) हा फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता तो कोणतीही लेखी परवानगी न घेता शहरांमध्ये फिरताना मिळून आला.याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# ‘संविधानाचा जागर’ करुन भिंगारच्या मिनी मॅरेथॉनमध्ये धावले युवक-युवती

## १३ वर्षांची शौर्या बेरड खुल्या गटात दुसरी, जय भीमच्या गजरात मॅरेथॉनमध्ये दिसला युवाशक्तीच्या जोश

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथे १४ एप्रिल रोजी आयोजित मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली. संविधान, समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा जागर करीत युवक-युवतींसह शालेय विद्यार्थी या स्पर्धेत धावले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथे १४ एप्रिल रोजी आयोजित मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचे आयोजन भीम जयंती उत्सव समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलनी, भिंगार यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जय भीम! च्या गजरात झाली. बीएसएनएलचे निवृत्त अधिकारी प्रदीप जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंडित नेहरु हायस्कूलचे मुख्याध्यापक सुहास धीवर, प्रदिप भिंगारदिवे, संभाजीराव भिंगारदिवे, श्यामराव वाघस्कर, निवृत्त सहा. फौजदार प्रदीप भिंगारदिवे, किशोर भिंगारदिवे, जनार्दन भिंगारदिवे, मच्छिंद्र भिंगारदिवे, डॉ. सिताताई भिंगारदिवे, मुख्याध्यापक संजय शिंदे आदींसह आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुहास धीवर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समाज घडविण्यासाठी जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात येत आहे. मागील वीस वर्षापासून मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करुन व पारंपारिक पध्दतीने मिरवणुक काढली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदीप जाधव यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करुन नवीन पिढीला प्रेरणा व दिशा देण्याचे कार्य सुरु आहे. महामानवाची जयंती फक्त डिजेवर नाचण्यासाठी नव्हे, तर त्यांच्या विचारांचे पाईक होण्यासाठी असावी, असे त्यांनी सांगितले.

सकाळी भिंगार येथील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात युवक-युवती व शालेय विद्यार्थी जमले होते. मुला-मुलींच्या विविध सहा वयोगटात ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेसाठी नगर-पाथर्डी रोडवरील वाहतूक काही काळासाठी वळविण्यात आली होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते निळा झेंडा दाखवताच विद्यार्थी अत्यंत उत्साह व जोशपूर्ण वातावरणात धावले. या स्पर्धेची विशेष आकर्षण ठरली ती १३ वर्षांची शौर्या हर्षद बेरड हिने खुल्या गटात सहभाग घेत दुसरा क्रमांक पटकावला. तिच्या या कामगिरीने प्रेक्षकांची मने जिंकली. उत्कृष्ट नियोजन, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांच्या योगदानातून स्पर्धा यशस्वी पार पडली.

या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी उद्योजक सादिक सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वीतेसाठी भिंगार येथील जेष्ठ क्रिडाशिक्षक कडूस सर, दिग्विजय क्रिडा मंडळाचे भरत थोरात, भिंगार स्पोर्टस क्लबचे मेजर विठ्ठल काळे, शंकर औरंगे, रमेश वाघमारे, भिंगार नाईट स्कूलचे क्रिडाशिक्षक शिर्के सर यांनी परिश्रम घेतले. आरोग्यसेवेसाठी छावणी परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलचे डॉ. राहुल ढाकणे आणि रुणवाहिका चालक शरद धाडगे तत्पर होते. आभार विकास चव्हाण यांनी मानले.

मिनी मॅरेथॉन स्पर्धेचा निकाल :- ८ वर्षे वयोगट (मुले) – प्रथम विशाल सूनील तनपुरे, व्दितीय ओमकार योगेश बेरड, तृतीय नैतिक ज्ञानदेव वाघस्कर., ८ वर्षे वयोगट (मुली) – प्रथम रिज़त लियाकत शेख, व्दितीय त्रिशा सोमनाथ दुसूंगे, तृतीय स्वरा हुमे., १० वर्षे वयोगट (मुले) – प्रथम ओंकार निलेश रासकर, व्दितीय शिवरूद्र नागेश भोसले, तृतीय ईश्वर संतोष बोरूडे., १० वर्षे वयोगट (मुली) – प्रथम हर्षदा रामदास घोलप, व्दितीय सई किरण बरबडे, तृतीय वैष्णवी प्रवीण जोशी., १२ वर्षे वयोगट (मुले) – प्रथम सत्यम विनोद सकट, व्दितीय निरंजन श्याम काळे, तृतीय वरूण ओमप्रकाश परदेशी., १२ वर्षे वयोगट (मुली) – प्रथम गायत्री प्रवीण शिर्के, व्दितीय रोशनी विनोद सकट, तृतीय पुर्वा नितीन शिर्के., १४ वर्षे वयोगट (मुले) – प्रथम ओम संतोष पवार, व्दितीय कुलक प्रफुल्ल भंडारी, तृतीय सिध्देश बाळू दळवी., १४ वर्षे वयोगट (मुली) – प्रथम माही प्रीतम परदेशी, व्दितीय स्मितल अतुल नागपूरे, तृतीय राधिका नागेश भोसले., १६ वर्षे वयोगट (मुले) – प्रथम सर्वेश सचिन दळवी, व्दितीय नवनाथ संजय बेद्रे, तृतीय हर्षदीप संतोष पवार., १६ वर्षे वयोगट (मुली) – प्रथम प्रणिता प्रवीण हिकरे, व्दितीय गौरी अजय कुल्लाळ, तृतीय श्रुतिका संदीप भवर., १८ वर्षे / खुला गट (मुले) – प्रथम कबीर सुदर्शन बेरड, व्दितीय सुहेल जफर खान, तृतीय प्रथमेश राजू राठोड., १८ वर्षे / खुला गट (मुली) – प्रथम वैभवी विजय खेडकर, व्दितीय शौर्या हर्षद बेरड, तृतीय माधवी गणेश दिवाण.



डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त किरण चाबुकस्वार मित्रमंडळाच्यावतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

## किरण चाबुकस्वार मित्रमंडळातर्फे अल्पोपहाराचे वाटप

नगर – माळीवाडा येथील किरण चाबुकस्वार मित्र मंडळाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अल्पोपहारचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेनेचे संभाजी कदम, किरण चाबुकस्वार, धर्मा चाबुकस्वार, राजु घासे, तिरुपती दोन्ता, किरण शिंदे, विनोदसिंग परमार, डि.के.कानडे, भिकु लझगरे, दिपु पंचवाणी, रमेश बोरुडे, शिवा भेळ, पप्पू चव्हाण, रोहिदास देवरे, सारा चाबुकस्वार, लक्ष्मी चाबुकस्वार, साधना घासे, प्रिया चाबुकस्वार, रिना भिंगारदिवे, रेष्मा भिंगारदिवे, राकेश शेफर्ड, संजय शेफर्ड, सीमा घंगाळे, बाबासाहेब आव्हाड आदी उपस्थित होते.



सम्बोधी विद्यार्थी वस्तीगृहात मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

## सम्बोधी विद्यार्थी वस्तीगृहात मिष्टान्न भोजनाचे वाटप

### बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त शाहू महाराज सेवाभावी संस्थेचा सामाजिक उपक्रम

नगर – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती लोकराजा छत्रपती शाहू महाराज सेवाभावी संस्थेतर्फे डीएसपी चौकाजवळील सम्बोधी विद्यार्थी वस्तीगृहात सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात आली. वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या मागासवर्गीय विभागाचे प्रदेश सचिव सुनील क्षेत्रे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

सुनील क्षेत्रे म्हणाले की, १४ एप्रिल ही केवळ जयंती नसून, ती एक प्रेरणादायक दिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील दलित, मागासवर्गीय, गरीब, शोषित आणि महिलांच्या उत्थानासाठी अर्पण केले. ते केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते, तर एक महान अर्थशास्त्रज्ञ व समाजसुधारकही होते. महिला सक्षमीकरण, सामाजिक समता, शिक्षणाचा प्रचार आणि अधिकारांची जाणीव यासाठी बाबासाहेबांनी दिलेला लढा आजही प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी वस्तीगृहाचे अधीक्षक नितीन कसबेकर, नितीन साळवे, रवींद्र तपासे सर तसेच इतर कार्यकर्ते आणि संस्थेचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व कार्यकर्ते व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पुतळ्यास अभिवादन करताना खा. निलेश लंके, रोहन शेलार, अथर खान, समीर पठाण, सागर चाबुकस्वार आदी.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना मनसे शहर उपाध्यक्ष दीपक दांगट व रामचंद्र आणा दिघे.

# देशातील वंचितासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्य समर्पित केले : विशाल कदम

नगर – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कामगार परिषदेच्या सातव्या अधिवेशनात कामाचे तास १२ वरून ८ तास केले. महात्मा फुले यांचे धोरण तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम हा लोकशाही प्रस्थापनेचा सच्चा मार्ग आहे अशी धारणा आंबेडकर यांची होती. आंबेडकर यांचा जन्म मध्य प्रदेशातील महू येथे झाला. शिक्षणाची गरज पसरवण्यासाठी आणि कमी उत्पन्न गटाची आर्थिक स्थिती समृद्ध करण्यासाठी त्यांनी दलितांच्या शिक्षण आणि मूलभूत कल्याणासाठी काम केले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशातील कोटी कोटी वंचित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नगर तालुका उपाध्यक्ष विशाल कदम यांनी केले.

नगर तालुक्यातील नेप्ती येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व महात्मा फुले यांची जयंती भीम ज्योत मित्र मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



नेप्ती येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व महात्मा फुले यांची जयंती भीम ज्योत मित्र मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरी करण्यात आली.

माजी सरपंच संजय जपकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नगर तालुका उपाध्यक्ष विशाल कदम व समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती पेटवून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. डॉ.आंबेडकर जयंती निमित्त महिलांनी घरासमोर सडा टाकून रांगोळ्या काढल्या होत्या.

नेप्ती ग्रामपंचायत मध्ये सुद्धा डॉ.आंबेडकर व महात्मा फुले यांची जयंतीसाजरी करण्यात आली. समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर व महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सरपंच, उपसरपंच, पोलीस स्टेशनचे अधिकारी आदी उपस्थित होते.

महात्मा फुले यांना डॉ.आंबेडकर आपले गुरु मानत होते. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्यात वैचारिक नातं होत. महात्मा फुले यांनी बहुजन समाजाला शिक्षण ज्या पुण्यातील भिडे वाड्यातून दिले त्यांची व आपल्या गुरु विषयी कृतज्ञता म्हणून डॉ.आंबेडकर यांनी संविधान ३९५ कलमाचे लिहिले. भारताचे पहिले कायदामंत्री डॉ. आंबेडकर होते. त्यांच्या काळात त्यांनी विविध कायदे आणि सामाजिक सुधारण्याचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी बजावली. संविधानाच्या मसुदा समितीवर सात जणांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी दोघांनी राजीनामा दिला. एकाचा मृत्यू झाला. एक विदेशात गेला. एकाची तब्येत ठीक नव्हती. एक राजकारणात अडकला त्यामुळे मसुदा समिती अध्यक्ष म्हणून संविधान लिहिण्याची सर्व जबाबदारी डॉ.आंबेडकर यांच्यावर येऊन पडली व त्यांनी समर्थपणे एकट्याने पार पाडली म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे खरे शिल्पकार आहेत. त्यामुळे संविधानाला कोणी हात लावू नये असे प्रतिपादन रामदास फुले यांनी केले.

यावेळी माजी सरपंच संजय जपकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नगर तालुका उपाध्यक्ष विशाल कदम, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष रामदास फुले, माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, दादू चौगुले, सोसायटी सदस्य सुरेश कदम, पोलीस पाटील अरुण होले, साहेबराव कदम, चंद्रकांत जाधव, भानुदास फुले, दत्ता कदम, स्वप्निल कदम, गणेश कदम, विशाल कदम, कुणाल कदम, ऋतिक जाधव, धनंजय आल्हाट, नानासाहेब होळकर, गुलाब राऊत, तुषार भुजबळ आदी उपस्थित होते.



अहमदनगर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या बॅनरचे अहमदनगर महाविद्यालयात अनावरण

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात रॅलीने झाली. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या बॅनरचे अनावरण करण्यात आले.




महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोऐल पारगे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन केले. तसेच उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग डॉ. प्रीतम बेदरकर, विनाअनुदानित विभागाचे समन्व्यक डॉ. सय्यद रझ्झाक आणि रजिस्ट्रार कल्पलता भिंगारदिवे यांनी पुष्प अर्पण करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.

यावेळी तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी कु. साक्षी भोसले हिने संविधानाच्या सरनाम्याचे वाचन केले. द्वितीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी कु. रिया तिवारी हिने स्वरचित ’एक योद्धा’ या हिंदी कवितेचे जोशपूर्ण वाचन केले व विज्ञानशाखेची विद्यार्थिनी कु.राजश्री झेंडे हिने आपले मनोगत व्यक्त करीत डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील घटनांना उजाळा दिला.

याचे नियोजन वाणिज्य विभागाचे प्रा. आनंद रायकवाड, इतिहास विभागाचे डॉ. सचिन मोरे, रसायनशास्त्र विभागाचे प्रा. संदीप रोहकले, परीक्षा विभागाचे संदीप साळवे, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. भागवत परकाळ, समाजशास्त्र विभागाचे डॉ. रवींद्र मते आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या स्थानिक शाखेचे समन्वयक डॉ. जी. एस. गायकवाड यांनी केले होते.

डॉ. आंबेडकरांची प्रतिमा रांगोळीद्वारे रेखाटत विद्यार्थी आदिल शेख याने अनोखे अभिवादन केले. ढोल-ताशे, झेंडे, पोस्टर्स, आणि जयघोषातुन विद्यार्थ्यांनी वातावरणात उत्साह निर्माण केला. विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित झाल्याने कार्यक्रमाला रंगत आली. शेवटी राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताने या कार्यक्रमाची सांगता झाली. बी. पी. एच. ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती उत्सव कार्यक्रम उत्साहात व शांततापूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत कटके यांनी केले.

# धम्माच्या प्रचारासाठी बुध्द रुप दान उपक्रम

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तथागत बुद्धिस्ट सोसायटीचा उपक्रम

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नगर तालुक्यातील वाळूंज येथील सम्राट बुद्ध विहार आणि आलमगीर येथील जेतवन बुद्ध विहारात बुध्द रुप दान करण्यात आले. तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाचे अध्यक्ष संजय कांबळे यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन सम्राट ग्रुपच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली.

मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन सम्राट ग्रुपच्या वतीने वाळूंज (ता. नगर) दरम्यान मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत तथागत बुद्धिस्ट सोसायटीच्या माध्यमातून देण्यात आलेल्या सव्वासाह फुटाचे बुध्द रुपाचा समावेश होता. मशाल प्रज्वलीत करुन या मिरवणुकीचे प्रारंभ झाले. यावेळी आंबेडकरी चळवळीतील समाजबांधवांसह युवक-युवती सहभागी झाले होते.

संजय कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन संपूर्ण भारतात धम्मप्रसाराचा संकल्प केला. बाबासाहेबांनी नगर जिल्ह्याला काटेरी जिल्हा म्हटले होते. पण आज याच जिल्ह्यात धम्माचे फुल उमलत आहे, हे बाबासाहेबांच्या कार्याचे फळ आहे.

ते पुढे म्हणाले, अनेक गावांमध्ये बुद्ध विहार असूनही तेथे बुद्ध रुप नाही. म्हणून अशा ठिकाणी बुद्ध रुप दान मोहिम राबविण्यात येत आहे. ही केवळ प्रतिष्ठापना नाही, तर धम्माच्या जागृतीचे बीज रोवण्याचा प्रयत्न आहे. तथागत बुद्धिस्ट सोसायटी ही संस्था बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमामुळे वाळूंज व आलमगीर येथील धम्मस्थळी नवचैतन्य निर्माण झाले आहे. उपासक, उपासिकांनी या मूर्तीचे व उपक्रमाचे स्वागत केले. अशा उपक्रमांद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व धम्मधारा घराघरांत पोहोचवण्याचे कार्य हाती घेण्यात येत आहे, आणि हे कार्य समाजप्रबोधनाच्या दिशेने भक्कम पाऊल ठरणार असल्याची भावना आंबेडकरी अनुयायींनी व्यक्त केली.



जैन मंदीर चोरी प्रकरणात अवघ्या ८ तासांत आरोपी अटक केल्याबद्दल महावीर चषक परिवाराच्या वतीने पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# जैन मंदीर चोरी प्रकरणात अवघ्या ८ तासात आरोपी अटक केल्याबद्दल महावीर चषक परिवारातर्फे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार

### कोतवाली पोलिसांची तत्परता कौतुकास्पद : संजय चोपडा

नगर – शहरातील महाजन गल्लीतील श्री महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिरातील चोरी प्रकरणी कोतवाली पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान करून अवघ्या आठ तासांमध्ये दोन आरोपींना पुणे जिल्ह्यातील भीमा कोरेगाव येथून मुद्देमालासह अटक करण्यात आली. कोतवाली पोलिसांची ही तत्परता कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महावीर चषक परिवाराचे सदस्य संजय चोपडा यांनी केले.

कोतवाली पोलिसांच्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, स.पो.नि. कुणाल सपकाळे, पो.उ.नि. गणेश देशमुख, म.पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, पो. हे.कॉ. विशाल दळवी, संदीप पितळे, सलिम शेख, पो.कॉ. दिपक रोहोकले, तानाजी पवार, अभय कदम, सुरज कदम, सचिन लोळगे, अमोल गाडे, राम हंडाळ, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, महेश पवार, सोमनाथ केकाण, सोमनाथ राऊत, म.पो.कॉ. प्रतिभा नागरे, दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडू आदींचा महावीर चषक परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी सदस्य संजय चोपडा, राजेंद्र गांधी, अजय गुगळे, चेतन बोगावत, विशाल शेटिया, सच्चिदानंद बोळे, अशोक बलदोटा, रमेश बोरा, सचिन चोपडा आदी उपस्थित होते.

# एनडीए परिक्षेत नगर येथील ईशान परभाणे याचे उत्तुंग यश



नगर – नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी (एनडीए–एनए २–२०२४) परिक्षेत अहिल्यानगरच्या ईशान निखिल परभाणे याने उत्तुंग यश संपादन केले आहे. ईशानने या महाकठिण परिक्षेत देशात १४९ व्या स्थानावर आपले नाव सिद्ध केले आहे. या परिक्षेतून देशात ७९२ विद्यार्थी निवडले गेले आहेत.

ईशान हा राष्ट्रीय इंडियन मिलीटरी कॉलेज, देहरादून या विद्यालयाचा विद्यार्थी आहे. तो आरआयएमसीच्या १९७ व्या बॅचचा विद्यार्थी असून जुलै २०२० च्या बॅचसाठी त्याची ऑल इंडियामधून चौदाव्या रँकवर निवड झाली होती. एनडीएची महाकठिण परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर आता ईशानला चार वर्षांची खडतर ट्रेनिंग पार पाडावी लागणार आहे. त्यानंतर भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदावर तो रुजु होईल, अशी माहिती त्याचे वडील निखिल परभाणे यांनी दिली.

दरेवाडी (ता. नगर) येथील कर्नल परब स्कुलमध्ये ईशानने इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण घेतले आहे. कर्नल दिलीप परब व गिता परब यांचे त्यास मार्गदर्शन लाभले. डिसेंबर २०१९ मध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय इंडियन मिल्ट्री कॉलेजच्या परिक्षेत ईशानचे देशात चौदावा क्रमांक मिळविला होता. महाराष्ट्र राज्यातून दरवर्षी केवळ दोनच विद्यार्थी निवडले जातात. त्यात ईशानची निवड झाली होती. त्या परिक्षेत ईशानला चारशेपैकी तब्बल ३०५ गुण मिळाले होते. त्यासाठी त्यास कर्नल परब स्कुलचे संचालक कर्नल दिलीप परब यांचे लाभले होते. या परिक्षेतून देशातील केवळ २५ विद्यार्थी निवडले जातात. त्यातही ईशान चौदाव्या स्थानावर होता.

ईशान हा येथील निखिल लाईट हाऊस व सनी इलेक्ट्रीकल्सचे संचालक तथा अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशने उपाध्यक्ष निखिल परभणे व तृप्ती परभाणे यांचा मुलगा आहे.



विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी अशुतोष लांडगे, उपाध्यक्षपदी वसंतसिंह यांची निवड करण्यात आली.

# विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी अशुतोष लांडगे, उपाध्यक्षपदी वसंतसिंह

नगर – विश्व हिंदू परिषद (विहिंप) महाराष्ट्र प्रांत समिती व जिल्हा संच बैठक १३ एप्रिल रोजी पुणे येथे पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड.आलोक कुमार यांनी भूषवले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पांडुरंग अण्णा राऊत, क्षेत्र मंत्री (मुंबई–गोवा प्रांत) गोविंद शेंडे, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, सहमंत्री ॲड.सतीश गोरडे व सर्व जिल्हा व विभागीय पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली. अशुतोष लांडगे यांची जिल्हाध्यक्ष तर वसंतसिंह यांची जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

नविन नियुक्त पदाधिकाऱ्यांचा जिल्हा मंत्री अनिल जोशी यांनी सत्कार केला. त्यांनी आपल्या भाषणात म्हणाले, नवीन नेतृत्वामुळे अहिल्यानगरमध्ये विहिंपचे कार्य अधिक जोमात सुरू होईल. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत आपले कार्य पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे.

यावेळी विभाग मंत्री सुनील खिस्ती आणि सहमंत्री शरद नगरकर यांचीही उपस्थिती होती. त्यांनी देखील नविन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांना संघटनात्मक बळकटीसाठी सक्रिय राहण्याचे आवाहन केले. नगरमधील इतर पदाधिकाऱ्यांनीही विश्वास व सहकार्याची ग्वाही दिली.

या बैठकीपूर्वी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड. आलोक कुमार यांनी अहिल्यानगर येथे संत संवादासाठी भेट दिली होती. त्यांनी लांडगे व वसंतसिंह यांना विहिंपच्या कार्याची दिशा व कार्यपद्धती विषद केली. ही बैठक विहिंपच्या राष्ट्र व धर्मकार्याच्या दृढ संकल्पाचे प्रतीक ठरली.

# सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय हक्क परिषद अभियान आयोजित 'मी सावित्री ज्योतिराव फुले' एकपात्री नाट्य प्रयोगास अहिल्यानगरमध्ये प्रतिसाद

नगर – सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान अहिल्यानगर यांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती औचित्य साधून माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, अहिल्यानगर येथे महाराष्ट्र महाराष्ट्र बाहेर गाजलेले 'मी सावित्री ज्योतिराव फुले' एकपात्री नाट्य प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या नाट्य प्रयोगाला अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरीकांनी प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन रेहमत सुलतान फौंडेशन, अहिल्यानगरचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, विनयकराजं फौंडेशनचे अध्यक्ष उद्योजक विपुल वाखरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भिंगार अर्बन बँकचे संचालक महेश झोडगे, सातारा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, मार्कंडेय विद्यालयाचे माजी प्राचार्य रावसाहेब क्षेत्रे, सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय हक्क परिषद अभियानाचे मुख्य संयोजक सुदाम लगड उपस्थित होते.

यावेळी विपुल वाखरे म्हणाले की, सरकारी शाळा वाचवणे काळाची गरज आहे. या अभियानासाठी मी आपल्या सोबत कायम आहे.



सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय हक्क परिषद अभियान आयोजित 'मी सावित्री ज्योतिराव फुले एकपात्री नाट्य प्रयोगास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना महेश झोडगे म्हणाले की, आज भांडवलशाही निर्माण झाली आहे. त्या विरुध्द सरकारी शाळा जगवणे व वाचवणे हे आपले परम कर्तव्य आहे.

ज्ञानदेव पांडूळे म्हणाले की, आपण सर्वांनी सरकारी शाळा वाचवून बहुजन समाजाला न्याय देण्यासाठी आपण संघटीत होऊन हा लढा चालू ठेवणे खुप गरजेचे आहे.

यावेळी अध्यक्षीय भाषणात युनूसभाई तांबटकर म्हणाले की, कविताताई मेहेत्रे यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवन परिचय व केलेला संघर्ष, शिक्षणासाठी दिलेले योगदान याचे हुबेहुब चित्रण प्रेक्षकांसमोर उभे केले. त्यामुळे प्रेक्षकांना सावित्रीबाई फुलेंचे कार्य समजले. शिक्षण किती महत्वाचे आहे. आणि शिक्षण सर्वांना मिळावे, यासाठी सुरु असलेल्या सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय हक्क परिषद अभियान हे आजच्या काळाजी गरज असून सर्वांनी यासाठी प्रयत्न करावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात रावसाहेब क्षेत्रे यांनी सरकारी शाळा वाचवा अभियानाची कल्पना सांगितले. व पाहुण्याचा परिचय करुन दिला. सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय हक्क परिषद अभियानाच्यावतीने नागरीकांना सावित्रीबाई फुले व ज्योतिबाफुले यांचे कार्यांची माहिती व्हावी. आणि त्यानी शिक्षणासाठी जो संघर्ष करुन त्यांनी कोणत्याही गोष्टींचा विचार न करता महिलांसाठी शाळा सुरु केली. शिक्षणातून समाज घडत असतो. त्यामुळे सर्वांना शिक्षण मिळावे, यासाठी या एकपात्री नाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आनंद द्रविड यांनी केले. श्रीकांत राऊत यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरमध्ये २३ एप्रिल रोजी जैन समाजाच्या महासंमेलनाचे आयोजन

नगर – जिल्ह्यातील सर्व जैन संघटना, महाराष्ट्र राज्य चतुर्थ झोन आणि श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या वतीने २३ एप्रिल रोजी सकाळी १० ते १ या वेळेत धार्मिक परीक्षा बोर्ड (आनंदधाम), अ.नगर येथे महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार असून, शैक्षणिक कर्ज, शिष्यवृत्ती, स्वयंरोजगार कर्ज, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण व तीर्थ संवर्धन यांसारख्या उपयुक्त योजनांबाबत मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमात राज्यमंत्री ललित गांधी व राष्ट्रीय अध्यक्ष अल्पसंख्याक योजना कांतीकुमार जैन प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती



अहिल्यानगरमध्ये २३ एप्रिलला होणाऱ्या जैन समाज महासंमेलनाच्या आयोजनाबाबतची माहिती देताना वसंत लोढा.

श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा यांनी दिली.

जैन समाजातील सर्व बांधवांनी संमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन वसंत लोढा यांनी केले. या बैठकीत राष्ट्रीय उपाध्यक्ष सतीश (बाबुशेठ) लोढा, राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा, राष्ट्रीय समन्वयक ईश्वर बोरा, राष्ट्रीय संचालक राजेंद्र बलदोटा, अनिल कटारिया, संजय कोठारी (जामखेड), नितीन पटवा, रोशन चोरडिया, पवन कटारिया, शरद शिंगवी (जामखेड), धनेश कोठारी, धनराज संचेती, उमेश बोरा, सुनील मालू, सचिन धरमचंद कटारिया, संतोष हस्तीमल गुगळे, सुदर्शन डुंगरवाल, संस्था प्रमुख सुभाष मुथा, समीर अरुण बोरा, अमित मुथा, रवींद्र बाकलीवाल, तुषार कर्नावट, हर्षल बोरा, नितीन शिंगवी (भिंगार) अनिल सुराणा, चंदन भळगट (पारनेर), नितीन बाफना (वांबोरी), महेश चुत्तर (राहुरी), अशोक गांधी (पाथर्डी) आदी उपस्थित होते.

# किरण पवार ॲकॅडमी येथे टेबल टेनिस स्पर्धेचा पारितोषिक वितरण

नगर – १२ व १३ एप्रिल दरम्यान किरण पवार टेबल टेनिस ॲकॅडमी येथे पार पडलेल्या अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. या स्पर्धेत एकूण ४५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

नेत्रतज्ञ डॉ. विमल राजपूत यांच्या हस्ते खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली. त्यांनी आपल्या भाषणात अभ्यास व खेळाचे महत्व व खेळात यशस्वी होण्यासाठी सरावात सातत्य असणे गरजेचे आहे असे सांगितले.



किरण पवार ॲकॅडमी येथे टेबल टेनिस स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी नेत्रतज्ञ डॉ.विमल राजपूत, ॲकॅडमीच्या संचालिका सौ.निवेदिता पवार, राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक किरण पवार व विजयी खेळाडू.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:– अकरा वर्षे वयोगट मुले– प्रथम– रिदान सारडा, द्वितीय– राजकुमार सानप तृतीय– चैतन्य मरकड., अकरा वर्षे वयोगट मुली– प्रथम– स्पृहा वैद्य, द्वितीय– सावी मोरे, तृतीय– इरा राजपूत., १७ वर्षे वयोगट मिक्स इव्हेंट प्रथम– सिया सुराणा, द्वितीय– अथर्व हरबा, तृतीय– विराज कराचीवाला., पुरुष गट– प्रथम– अद्वैत गीते, द्वितीय– कनक उंडे, तृतीय– अथर्व हरबा., प्रौढ गट– प्रथम राजेंद्र आंधळे, द्वितीय– डॉ. अनिल बोठे, तृतीय– दीपक केळकर.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲकॅडमीच्या संचालिका सौ. निवेदिता पवार यांनी केले. या स्पर्धेत राजवीर कराळे, आरुष करडे, प्रणिल ठिगळे, मित वर्मा, अथर्व मेहरवाल, शौनक चॅटर्जी, समदर्श पुरुसवाणी यांनी चांगला खेळ केला. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय खेळाडू साक्षी पवार तसेच प्रेम भोसले, अभिजीत ससाणे, ऋषभ पुंड, प्रणव पानसरे यांनी परीश्रम घेतले. खेळाडूंना राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते क्रीडा व योगशिक्षक किरण पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीतील प्रा.कल्पना विधाते यांना पी.एच.डी.पदवी प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामधील प्रा.कल्पना दीपक विधाते यांना इंदौर येथील ओरीएंटल विद्यापीठ येथून कृत्रिम बुध्दिमत्ता वापरुन निवासी इमारतींचे ऊर्जा वापर, विश्लेषण आणि अंदाज या विषयावर विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.)पदवी प्रदान करण्यात आली. सदर अभ्यासक्रमात त्यांना इंदौर येथील ओरिएंटल विद्यापीठाचे डॉ.प्रज्ञा नेमा यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.कल्पना विधाते यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल, स्कोपस–१, वेब ऑफ सायन्स १ व एबीडीसी–१ इत्यादी जर्नल्समध्ये एकुण ०३ पेपर प्रसिध्द केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०४ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

या यशाबद्दल संचालक तंत्र प्रा.सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. उदय नाईक, चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम.गायकवाड यांनी त्यांचे कौतुक केले.



बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मचे ज्येष्ठ संचालक अशोक जोशी यांच्या निधनानंतर खा.निलेश लंके यांनी जोशी परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.

# खा. निलेश लंकेंकडून जोशी परिवाराचे सांत्वन

नगर – बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मचे ज्येष्ठ संचालक अशोक जोशी यांचे नुकतेच निधन झाले. खासदार निलेश लंके यांनी शोक व्यक्त करत जोशी परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले आहे. यावेळी खा.लंके म्हणाले, स्व.अशोक जोशी हे खूप धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते. नगरमधील अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांची भेट होत असे. अनेक उपक्रमांनाही त्यांची मदत होत असे. ते आजारी असल्याचे समजल्यावरही मी हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. अशोक जोशी यांचे निधन झाल्याचे समजल्यावर मोठे दु:ख झाले.

यावेळी राजकुमार जोशी, अनिल जोशी, संजय जोशी, कृष्णा जोशी, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सुरेश वारे व योगीराज गाडे आदी उस्थित होते.

# मातोश्री वृध्दाश्रमास बोल फाऊंडेशनची भावस्पर्शी भेट

नगर – ब्रेड ऑफ लाईफ, बोल फाऊंडेशन या प्रतिष्ठणातर्फे १२ एप्रिल रोजी विळदघाट परिसरातील मातोश्री वृध्दाश्रमास एक भावस्पर्शी भेट आयोजित केली होती. फाऊंडेशनचे चेअरमन जोसेफ पाटोळे यांनी वृध्दाश्रमातील सुमारे तीस वृध्द स्त्री व पुरूषांची भावनिक ओळख करून घेतली. फाऊंडेशनतर्फे उपस्थित स्वयंसेवकांनी 'तू बुध्दी दे, तू तेज दे नवचेतना विश्वास दे' या चेतना व उर्जा निर्माण करणाऱ्या प्रार्थनेव्दारे उपस्थित वृध्दांचे मनोबल वाढवून त्यांना एका आनंदमय वातावरणात घेऊन गेले.

'हरवले आभाळ ज्यांचे हो त्यांचा सोबती' या ओळीव्दारे पुनः एकदा एका नवीन स्फूर्ती जनक जीवन जगण्याचे धैर्यं फाऊंडेशनच्या सचिव शोभा पाटोळे यांनी भावपूर्ण गीताव्दारे



ब्रेड ऑफ लाईफ, बोल फाऊंडेशन या प्रतिष्ठणातर्फे विळदघाट परिसरातील मातोश्री वृध्दाश्रमास एक भावस्पर्शी भेट आयोजित केली होती.

स्वयंसेविकांच्या साथीने सादर केले तसेच 'प्रेमस्वरूप आई' या सादर केलेल्या गीताव्दारे वृध्द स्त्री व पुरूषांचे डोळे पाणावले. या प्रसंगी वृध्द स्त्री व पुरूष यांनी आपल्या वैयक्तिक भावना थोडक्यात व्यक्त केल्या.

प्रतिष्ठाणच्या सभासदांनी फळांचे वाटप केले. मातोश्री वृध्दाश्रमाचे व्यवस्थापक दिलीप चोरडीया यांनी बोल फाऊंडेशन दरवर्षी मातोश्री वृध्दाश्रमाला भेट देऊन एक आगळे वेगळे नाते जोडल्याचे मत व्यक्त केले.

जोसेफ पाटोळे यांनी मातोश्री वृध्दाश्रम भेटीबद्दल थोडक्यात मनोगत व्यक्त केले. या भेटीप्रसंगी कु. अलफोन्सा मरियादास, व्हॉयलेट पिटर, रानी भोसले, सौ. जयशीला मेन्डोन्सा, सुशीला अंतोंन पाटोळे व नितीन पाटोळे यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. जोसेफ पाटोळे यांनी दिलीप चोरडिया यांचे आभार मानले.



# जास्त विचार करु नकोस

गेली दोन वर्षे बॉयफ्रेंडबरोबर रिलेशनशीपमध्ये होते. या नात्याकडे गांभीर्याने पहात होते. पण मित्राला परदेशी जॉब लागला आणि आम्हा दोघांनाही लाँग डिस्टन्स रिलेशनशीप नको असल्यानं ब्रेक अप करण्याचा निर्णय घेतला. पण त्यानंतर दोन महिन्यांमध्येच तो नव्या रिलेशनशीपमध्ये असून लवकरच त्या मुलीशी लग्न करणार असल्याचं एका कॉमन फ्रेंडकडून समजलं आहे. खरं तर मला त्याच्याबद्दल आनंदच आहे, पण इतक्या लवकर तो माझं प्रेम विसरल्याचं दु:खही आहे. या घटनेमुळे प्रेमाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोनच बदलला आहे. या नैराश्यातून मी कशी बाहेर पडू?

**मॅच मेकिंग**


– एखाद्या नात्याकडे बघण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. कोणी लवकर मूव्ह ऑन करतो तर कोणाला अधिक वेळ लागतो. त्यामुळे ब्रेक अप नंतर तुझ्या बॉयफ्रेंडने लगेचच नवं नातं स्वीकारलं यात चुकीचं काही नाही आणि तू थोडा वेळ घेत आहेस हेदेखील सामान्य आहे. म्हणूनच विनाकारण ताण घेऊ नकोस. कोणत्याही कॉमन फ्रेंडच्या माध्यमातून अथवा सोशल मीडियावरुन एक्स बॉयफ्रेंडबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करु नकोस. आता तू पूर्णपणे तुझ्या करिअरकडे आणि भविष्याकडे फोकस कर. म्युच्युअली ब्रेक अपचा निर्णय घेतला असल्यामुळे स्वत:ला अपराधी समजू नकोस.

# पाचशे रुपयांपासून व्यवसाय, आता मालकीची कंपनी

**अचिव्हर**

मनात काही करण्याची दुर्दम्य इच्छा असेल तर तुम्ही ठरवलेल्या ठिकाणापर्यंत नक्कीच पोहोचाल, हे विधान जहानाबादचा रहिवासी अभिषेक कुमार याला चपखल लागू होते. एकेकाळी ५०० रुपयांपासून व्यवसाय सुरू करणारा ३५ वर्षांचा हा तरुण कंपनी काढेल, असा विचारही कुणी केला नव्हता. आज तो प्रसिद्ध उद्योजक असून अनेक प्रकारची लोणची बनवतो. तो फ्लिपकार्ट, ॲमेझॉन आणि स्वत:च्या आउटलेटवरून मार्केटिंग करत आहे.

या व्यवसायात त्याने आठ जणांना रोजगारही दिला आहे. यासोबतच कंपनीची वेबसाइटही सुरू केली आहे. यायोगे प्रत्येक ग्राहकाला लोणचे सहज खरेदी करता येईल. 'नेरा पिकल्स' असे त्याच्या कंपनीचे नाव आहे.



**पूर्वी बांगड्यांचा व्यवसाय**

२०२० च्या आधी अभिषेक बांगड्यांचा व्यवसाय करत होता. मात्र कोरोना महामारीने त्याची रोजीरोटी हिरावून घेतली. त्यानंतर तो काही वेळ घरी बसला. अशातच वृत्तपत्रातील एका जाहिरातीने त्याला मार्ग दाखवला. त्यात स्थलांतरित मजुरांना अनेक संधी उपलब्ध करून दिल्या होत्या. तीच जाहिरात पाहून मशरूमबद्दल जाणून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यासाठी तो कृषी कार्यालयात गेला. मशरूमची खरेदी-विक्री कशी होते आणि त्यापासून इतर काही पदार्थ बनवले जातात की नाही हेदेखील त्याला माहीत नव्हते. पण त्याने यासंबंधीची सगळी माहिती मिळवली.

**५०० रुपयांपासून प्रवास**

येथून त्याचा व्यवसायाच्या क्षेत्रातील प्रवास सुरू झाला. त्याने जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्रात जाऊन मशरूम उत्पादनाचे प्रशिक्षण घेतले. मात्र दोन वर्षे उत्पादन घेऊनही अपेक्षित फायदा न झाल्यामुळे त्याने दुसरा मार्ग शोधू लागला. आता त्याने गंधार येथील कृषी विज्ञान केंद्रातून मशरूमपासून लोणचे बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. मशरूमचे लोणचे बनवण्याचा प्रवास २०२२ पासून सुरू केला. यामध्ये अभिषेकला आईची पूर्ण साथ मिळत आहे.

**१५ प्रकारची लोणची**

अभिषेकने सांगितले की, आई घरी लोणची घालायची आणि आम्ही ते बाजारात आणायचो. त्यासाठी आवश्यक ते सर्व परवाने घेतले. आज आमची उत्पादने सर्वत्र ऑनलाइन आणि ऑफलाइन उपलब्ध आहे. हा व्यवसाय अवघ्या ५०० रुपयांपासून सुरू झाला. २२ मार्च रोजी बिहार उद्योजकता पुरस्काराने अभिषेकला सन्मानित करण्यात आले. सध्या त्यांच्याकडे १५ विविध प्रकारची लोणची तयार होतात. लवकरच आणखी १५ प्रकारची चविष्ट लोणची बाजारात आणण्याची तयारी सुरू आहे.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| मिल जाता है दो पल का सुकुन चंद यारों की बंदगी में, वरना परेशां कौन नहीं अपनी अपनी जिंदगी में। | न बोलूं न लिखूं तो ये मत समझना कि भूल गए हम, खामोशियों ने भी कुछ जिम्मेदारी ले रखी है। | किसी की सलाह से रास्ते जरूर मिलते हैं। पर मंजिल तो खुद की मेहनतसेही मिलती है। |

**टेक अपडेट्स्**

### खिडकीवर एसी बसवताय?




एसीला योग्य वायुवीजन मिळत नसेल तर यंत्र जास्त गरम होते. अशा परिस्थितीत गॅस गळती आणि स्फोट होण्याची शक्यताही वाढते. याशिवाय एसीचे वायरिंग खराब झाल्यास किंवा व्होल्टेजमध्ये चढउतार झाल्यास शॉर्ट सर्किट आणि आग लागण्याची शक्यता वाढते. हे टाळण्यासाठी एसीची वेळोवेळी तपासणी व्हावी. लोक वेळेत एसीचे सर्व्हिसिंग करत नाहीत. त्यामुळे कूलिंग कॉइल आणि कॉम्प्रेसरमध्ये घाण साचते. मशीनवर याचा दबाव येतो. यातूनच स्फोट होण्याचा धोका वाढतो. म्हणूनच एसीचे सर्व्हिसिंग नियमित करुन घ्यावे.

**टेक टॉक**

### व्हॉटस्पवरची ब्ल्यू टीक बंद करायचीय?


व्हॉट्सपवरील ब्लू टिक बंद करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे. फक्त तीन सोप्या पायऱ्या वापरा. व्हॉट्सपवर मेसेज पाठवल्यानंतर एक टिक येते म्हणजे तुमच्या बाजूने मेसेज गेला आहे. डबल टिक म्हणजे मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचला आहे. ब्लू टिक म्हणजे तुम्ही पाठवलेला मेसेज वाचला गेला आहे. हीच ब्लू टिक बंद करण्यासाठी प्रथम ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. प्रायव्हसीवर क्लिक करा. रीड रिसीप्ट्सवर क्लिक करा. त्यानंतर मेसेजवरील ब्लू टिक बंद होईल.




**उपाय**

### हिस्ट्री हटवण्यासाठी...

आज फोनवरील 'चॅटजीपीटी' हिस्ट्री कशी हटवायची हे जाणून घ्या. सर्वप्रथम स्मार्टफोनमध्ये 'चॅटजीपीटी' ओपन करा. त्यानंतर उजव्या कोपऱ्यातील दोन ओळींच्या चिन्हावर क्लिक करा. येथे तुम्हाला हिस्ट्री दिसेल. आता 'जीपीटी' एक्सप्लोर करा. तुम्ही 'चॅटजीपीटी' ला विचारलेल्या सर्व प्रश्नांचा इतिहास या विंडोमध्ये पाहू शकता. आता प्रोफाइल पुढील तीन ठिपक्यांवर क्लिक करा, त्यानंतर डेटा नियंत्रणावर क्लिक करा. पुढील विंडोमध्ये तुम्हाला 'क्लिअर चॅट हिस्ट्री' चा पर्याय दिसेल. त्यावर वर क्लिक करून, तुम्ही 'चॅटजीपीटी' वरून हिस्ट्री हटवू शकाल. वेबवरील 'चॅटजीपीटी' चा शोध इतिहास हटवण्यासाठी तुम्हाला प्रथम वरच्या कोपऱ्यातील प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करावे लागेल. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सेटिंग्ज पर्यायावर क्लिक करा. आता जनरल पर्यायावर क्लिक करा. तळाशी 'डिलीट ऑल चॅट्स' वर क्लिक करावे लागेल. अशा प्रकारे तुम्ही 'चॅटजीपीटी' चा संपूर्ण इतिहास एकाच वेळी हटवू शकाल.



# 'चेक इन बॅगे'च्या मर्यादेत वाढ

सध्या शिक्षण, नोकरी वा पर्यटनाच्या हेतूने तरुणांना बरेचदा विमानाने प्रवास करावा लागतो. मात्र वारंवार विमानप्रवास करत असाल तर ही बातमी फक्त तुमच्यासाठीच आहे हे लक्षात घ्या. 'एअर इंडिया एक्सप्रेस'ने बॅगेज पॉलिसीमध्ये मोठा बदल केला आहे. याअंतर्गत प्रवाशांसाठी चेक इन बॅगेज मर्यादा वाढवण्यात आली आहे. प्रवाशांना सुविधा देण्यासाठी 'एअर इंडिया'ने हा बदल केला आहे. नवीन बदलानुसार 'एअर इंडिया एक्सप्रेस' आता प्रवाशांना सात किलो केबिन बॅगेजसह ३० किलो 'चेक-इन बॅगेज'ची सुविधा देत आहे.

'एअर इंडिया'च्या आधीच्या नियमानुसार प्रवाशांना फक्त २० किलोपर्यंतचे सामान 'चेक-इन' करण्याची परवानगी होती. मात्र आता नियमात बदल करून प्रवाशांना १० किलो अतिरिक्त सामानाची सुविधा देण्यात आली आहे. बॅगेज धोरणातील बदलानुसार प्रवाशांना दोन केबिन बॅगेज नेण्याची मुभा असेल. तथापि, दोन्ही पिशव्यांचे वजन सात किलोपेक्षा जास्त नसावे. यामध्ये लॅपटॉप बॅग, हँडबॅग, बॅकपॅक किंवा लहान आकाराच्या बॅग्ज समाविष्ट आहेत. केबिन बॅगेजचा आकार ४० सेमी * ३० सेमी *१० सेमी पेक्षा जास्त नसावा. या आकारातील बॅग समोरच्या सीटखाली आरामात बसू शकते.




**महत्त्वाचे काही**

**मुलांसाठी खास सवलत**

लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना अतिरिक्त सुविधा देण्यात आल्या आहेत. 'बॅगेज पॉलिसी'मध्ये त्यांच्यासाठी १० किलो जास्तीची तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, मुलांसह प्रवास करणारी कुटुंबे एकूण ४७ किलो वजन नेऊ शकतील. ४० किलो चेक-इन बॅगेज व्यतिरिक्त यात सात किलो केबिन बॅगचा समावेश असेल.

**प्रत्येक फ्लाइटमध्ये सुविधा नाही**

अर्थात 'एअर इंडिया एक्सप्रेस'च्या प्रत्येक फ्लाइटमध्ये प्रवाशांना ही सुविधा नाही. 'बॅगेज पॉलिसी'तील बदल भारत, मध्य पूर्व आणि सिंगापूरमधील आंतरराष्ट्रीय फ्लाइट्सवरच लागू होईल. इतर फ्लाइट्सवरील बॅगेज पॉलिसी पूर्वीप्रमाणेच राहील. म्हणजे २० किलो चेक-इन बॅगेज व्यतिरिक्त फक्त सात किलो केबिन बॅगेज नेता येईल. तेव्हा या एअरलाईन्सने प्रवास करणार असाल तर बदल लक्षात घ्या.



# निसर्गाचे अभ्यासक व्हा

तुम्हाला निसर्गाप्रती प्रेम असेल, जंगलं, प्राणी, पक्षी, किटक यांमध्ये रमायला आवडत असेल तर निसर्गतज्ज्ञ म्हणून काम करता येईल. ऑफबीट अशा या करीअरमध्ये आज असंख्य संधी आहेत. निसर्गाकडे अनेकांचा कल वाढतो आहे. निसर्ग संवर्धनाची जाणीव होते आहे. अशा परिस्थितीत निसर्गतज्ज्ञ लोकांना मार्गदर्शन करू शकतात.

आपल्या देशात अनेक अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. इथे गेल्यावर प्राणी, पक्षी दुरून बघण्यापेक्षा त्यांची योग्य ती माहिती मिळाली तर भटकंतीचा अनुभव अनेक अर्थांनी समृद्ध होत जातो. जंगलांमधल्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. सर्वसामान्यांना ती दृष्टी नसते. एखाद्या पक्ष्याचा आवाज काहीतरी संदेश देत असतो. हरणांचं ओरडणं ही वाघ येत असल्याची वर्दी असू शकते. निसर्गतज्ज्ञांना या सर्वांचं ज्ञान असतं.

**करीअर ग्रोथ**

राष्ट्रीय उद्यानांमध्ये येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम निसर्गतज्ज्ञ करतात. वन विभागाशी सहकार्य करून गाईड्सना प्रशिक्षण देण्याचं कामही ते करतात. जंगलात सर्वेक्षण करतानाही यांची मदत घेतली जाते. शास्त्रज्ञांनाही त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होतो. बायोसायन्स किंवा पर्यावरण व्यवस्थापनासारख्या विषयांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही या क्षेत्राकडे वळू शकता. नोकरी करण्यासोबतच तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकता. टूर्स आयोजित करता येतील.

# बाजारात नवे काय?



**स्मार्ट शॉपिंग**

या महिन्यात बरेच स्मार्टफोन भारतीय बाजारपेठेत दाखल झाले आहेत. यामध्ये मोटोरोला ते विवो पर्यंतच्या स्मार्टफोनचा समावेश आहे. महिन्याची सुरुवातच 'मोटोरोला एज ६० फ्युजन' च्या लॉन्चने झाली आहे.

**मोटोरोला एज ६० फ्यूजन**

मोटोरोला एज ६० फ्युजन स्मार्टफोन चर्चेत आहे. या फोनमध्ये १.५ के मोल्ड डिस्प्ले आहे. या फोनची किंमत जवळपास ३५ हजार रुपये आहे.

**पोक्को ७१**

ही कंपनी बजेट फ्रेंडली स्मार्टफोन 'पोक्को सी ७१' भारतीय बाजारात लॉन्च करत आहे. या फोनची किंमत २० हजार रुपयांच्या दरम्यान असल्याचे समजते.

**आयक्यूओओझेड १० फाईव्ह जी**

'आयक्यूओओझेड१० फाईव्ह जी' भारतीय बाजारपेठेत दाखल होत आहे. या स्मार्टफोनची जाडी फक्त ०.७८९ सेमी आहे आहे. कंपनीचा दावा आहे की, हा बाजारातील सर्वात पातळ फोन फोन आहे. यात ७३००एमएएचची मोठी बॅटरी असून तो केवळ ॲमेझॉनवर विकला जातोय. त्याची किंमत २० ते २५ हजार रुपयांपर्यंत आहे.

**विव्हो टी ४५ जी**

'व्हिवो' 'टी ३ फाईव्ह जी'चा उत्तराधिकारी म्हणून 'व्हिवो टी ४ फाईव्ह जी' भारतीय बाजारात लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. हा बजेट स्मार्टफोन असेल जो कंपनी २५ हजार रुपयांच्या रेंजमध्ये लॉन्च करू शकते.

**व्हिवो व्ही ५० ई**

'व्हिवो' लवकरच 'व्ही ५०' मालिकेतील दुसरा स्मार्टफोन 'व्हिवो व्ही ५०ई' देखील भारतीय बाजारात लॉन्च करू शकते. ३० हजार रुपयांच्या रेंजमध्ये तो खरेदी करता येईल.

# रात्रीचा अभ्यास फायद्याचा



**स्टडी टॉक**

अनेकजण वर्षभर स्पर्धा परीक्षांच्या तयारीत असतात. तेव्हा मित्रांनो, रात्री उशिरा अभ्यास केल्याने होणाऱ्या फायद्यांकडे अजिबात दुर्लक्ष करु नका. दिवसाच्या तुलनेत रात्री अभ्यास करण्याचे अनेक फायदे आहेत.

दिवसभरातील फोन कॉल्स, सोशल मीडिया, मित्र आणि कौटुंबिक गोष्टी अभ्यासात व्यत्यय आणू शकतात. मात्र रात्री हे विचलित होणे टाळता येते. यामुळे एकाग्रता साधते आणि अभ्यास चांगला होतो. तुम्ही स्वतःच्या गतीने आणि आपल्या पद्धतीने अभ्यास करु शकता. स्वनियंत्रण आणि वेळेच्या व्यवस्थापनासाठीही हे उपयुक्त आहे.

**एकाग्रता वाढते**

अलिकडे शांत वातावरण सहसा रात्रीच अनुभवायला मिळते. रात्री रहदारीचा आवाज वा अन्य अडथळे नसतात. कमी आवाजामुळे मन एकाग्र होते. लक्ष केंद्रित होणे शक्य होते. कोणतीही संकल्पना सखोलपणे समजून घेण्यास याची मदत करते.

**मेंदू अधिक सक्रिय**

रात्री मेंदू अधिक सक्रिय होतो. सर्जनशील आणि गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी हा सर्वोत्तम काळ आहे. रात्री अभ्यास केल्याने अवघड संकल्पना पटकन समजून घेण्याची आणि लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते. रात्रीची वेळ क्रिएटिव्ह थिंकिंगला उत्तेजन देते. अशा वेळी नवीन कल्पना सुचतात आणि अभ्यासाच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होऊ शकते.

रात्री दिवसभराच्या ताणाचा निचरा होऊन मन शांत झालेले असते. मनःस्थितीची साथ मिळते. याचाही फायदा करून घेता येतो. त्यामुळे गुंतागुंतीच्या विषयासाठी, आकलनासाठी हा वेळ निवडा. रात्री अभ्यास करताना फोन बाजूला ठेवा. हा नियम आवर्जून पाळा.

# असा निवडा स्लीव्हलेस टी-शर्ट

**फॅशन पॅशन**

दोस्तांनो, उन्हाळ्यात स्लीव्हलेस टी शर्टचा वापर सुखावह ठरतो. तेव्हा तुम्ही स्लीव्हलेस टी शर्टच्या खरेदीच्या विचारात असाल तर या टिप्स नक्कीच कामी येतील.

* स्लीव्हलेस टी शर्ट घेताना फिटिंगकडे नीट लक्ष द्या. स्लीव्हलेस टी शर्टचं फिटिंग महत्त्वाचं नसतं, हा एक गैरसमज आहे. प्रत्यक्षात योग्य फिटिंगचा टी शर्ट घेणं महत्त्वाचं असतं. फार ढगळ टी शर्ट घातल्याने तुम्ही विचित्र दिसू शकता.


* उन्हाळ्यात गडद रंगाचे टी शर्ट घालू शकता. सौम्य रंगाचे टी शर्ट थंडावा देतात. त्यामुळे पांढरा, ग्रे, बेच आणि आकाशी अशा रंगांना प्राधान्य द्या.

* टी शर्टचा कपडाही महत्त्वाचा असतो. उन्हाळ्यात कॉटन, लिलनचे कपडे घ्या. सुपिमा कॉटन हा प्रकार नेहमीच्या कॉटनपेक्षा जास्त आरामदायी असतो. त्यामुळे या कापडाचे टी शर्ट घ्या.

* उन्हाळ्यात फिरायला जायच्या योजना असतील तर स्लीव्हलेस टी शर्ट मस्ट आहे. शॉर्टस, कॅज्युअल पँट कशावरही तो चालून जाईल. त्यावर स्नीकर्स, फ्लोटर्स यापैकी काहीही घालता येईल.

* समुद्रकिनारी फिरायला जाणार असाल तर स्लीव्हलेस टी शर्ट तुमच्या बॅगेत असायलाच हवा.

मग काय दोस्तांनो, लागा खरेदीला. ट्रेंडी स्लीव्हलेस टी शर्टसची भरपूर व्हरायटी तुम्हाला पहायला मिळेल.



# ...म्हणून हवा पर्सनल ट्रेनर

**फिटनेस फंडा**

फिटनेस राखणं ही आजच्या धकाधकीच्या काळातली गरज आहे. मात्र हे कळतं पण वळत नाही अशी अनेकांची स्थिती असते. तुमचीही हीच समस्या असेल तर पर्सनल ट्रेनर अपॉईंट करण्याचा निर्णय घ्या. हा थोडा खर्चिक असला तरी खूप फायद्याचा सौदा ठरतो. कसा ते पाहू.

* वर्क आऊट ही एक कमिटमेंट आहे. पण प्रत्येकाला ती गांभीर्याने पाळता येतेच असं नाही. वर्क आऊट टाळल्यानंतर आपण आपल्यालाच माफ करत राहतो. मात्र पर्सनल ट्रेनर तुम्हाला व्यायाम टाळणं ही चूक असल्याचं प्रकर्षाने दाखवून देतो त्याचबरोबर वर्क आऊट करण्यासाठी पुश करत राहतो. हे मोटिव्हेशन खूप महत्त्वाचं असतं.

* नाही म्हटलं तरी व्यायाम थकवून टाकतो. त्यामुळे व्यायामाचा वेळ कमी करण्याकडे अथवा थकवणारे व्यायाम प्रकार टाळण्याकडे अनेकांचा कल असतो. पण पर्सनल ट्रेनर तुम्हाला अधिक धावण्यासाठी, अधिक पुश अप्स करण्यासाठी, अधिक जड प्लेट्स उचलण्यासाठी, ट्रेडमीलवर अधिक काळ धावण्यासाठी प्रवृत्त करतो. सहाजिकच तुमच्या शरीराला आवश्यक तो आणि आवश्यक तेवढा व्यायाम मिळतो.



* तुम्ही एखाद्या बर्गर जॉईंटवर जाता. मग खाण्याचा मोह आवरत नाही. पण अशा वेळी पर्सनल ट्रेनरचे शब्द कानात घुमतात आणि तुम्ही मोहाचे ते क्षण टाळू शकता. कारण हा फिटनेस तज्ज्ञ केवळ व्यायामाबाबत मार्गदर्शन करत नसतो तर तुमचं समुपदेशनही करत असतो.

* पर्सनल ट्रेनरची वर्क आऊटसाठी तयार करताना बोलण्याची पद्धतही वेगळी असते. '२५ क्रंचेस काढ' असं थेट सांगण्यापेक्षा तो तुम्हाला वेगळ्या भाषेत हीच बाब सांगतो.

* पर्सनल ट्रेनर असेल तर इच्छित फिटनेस लेव्हल गाठण्याची शक्यता ३० टक्क्याने वाढत असल्याचं एका निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. म्हणूनच पर्सनल ट्रेनर घेण्यास मागे-पुढे पाहू नका.

# ‘शेतकरी, लाडक्या बहिणी, युवक व ज्येष्ठ नागरिकां’ची फसवणूक करणाऱ्या सरकारच्या जाहीरनाम्याच्या होळी आंदोलनास ‘शिवसेना ठाकरे’चा पाठिंबा

**महायुती सरकारमध्ये लबाडांची फौज : किरण काळेंचा आरोप**




नगर – राज्यात सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी जाहीरनामा मधून अनेक आश्वासन मतदारांना दिली होती. मात्र ती पाळण्यामध्ये सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. किंबहुना सरकारची जनतेची फसवणूक करण्याचीच नियत आहेत हे आता स्पष्ट झाले आहे. या फसवणुकी विरोधात स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेने शेतकरी नेते अनिल घनवट यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर १४ एप्रिलपासून सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करण्याचे आंदोलन छेडले आहे. या आंदोलनाला अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. तसे पाठिंबाचे पत्र घनवट यांना काळे यांनी पाठवले आहे.


पत्रात काळे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या, महायुतीचे सरकार मताधिक्याने निवडून आले. निवडणुकीत महायुतीतील प्रमुख पक्षांनी एक संयुक्त जाहीरनामा काढून जनतेला आश्वासन दिली होती व सरकार सत्तेत आल्यास सर्व आश्वासने पूर्ण करण्याची हमी दिली होती. त्यात शेतकऱ्यांची कर्ज माफी, मोफत वीज, लाडक्या बहिणींना २१०० रुपये, बेरोजगार तरुणांना महिन्याला १०,००० रुपये, ज्येष्ठ नागरिकांना दर महिन्याला २१०० रुपये पेन्शन, सोयाबीनला ६००० रुपये भाव देणार, शेतकऱ्यांनी भरलेला जीएसटी परत देणार, वन्यप्राण्या पासून पिकांचे नुकसान व जिवित हानी होणार नाही यासाठी उपाय योजना वगैरे असे पंचवीस ठळक मुद्दे आहेत.

काळेंनी पुढे म्हटले आहे, कर्जमाफी तर पहिल्या कॅबिनेट मीटिंग मध्ये जाहीर करणार, शेतकऱ्याचा सातबारा कोरा करणार अशी भाषणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातबारा कोरा केला नाही तर पवाराची औलाद सांगणार नाही असे ठणकावून सांगितले होते. प्रत्यक्षात आताचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवारांनी, कर्जमाफीची वाट पाहू नका, कर्ज भरून टाका अशी तंबी शेतकऱ्यांना दिली आहे. बँकेच्या नोटीस येत आहेत. तसेच काही ठिकाणी जमीन जप्ती व लिलावाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. त्याचा शिवसेनेने निषेध करत महायुती सरकारमध्ये लबाडांची फौज सत्तेत बसली असल्याचा घाणाघात काळे यांनी केला आहे.

काळे पुढे म्हणाले, सोयाबीन आधारभूत किमतीच्या खाली विकावे लागले. ६००० रुपये कोणालाच मिळाले नाही. रासायनिक खते, कीटकनाशके, ट्रॅक्टर, स्पेअर पार्ट यावर शेतकरी भरत असलेला राज्याचा जीएसटी परत करण्याबाबत गेल्या अर्थसंकल्पात काहीच तरतूद नाही. लाडक्या बहिणींना अनुदान वाढ तर नाहीच, पण आहे ते १५०० पण मिळत नाहीत. वृद्धांची पेन्शन वाढ झाली नाही की सुशिक्षित बेरोजगार तरुणांना भत्ता नाही. जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने गेल्या अर्थ संकल्पात कोणतेच पाऊल उचललेले दिसत नाही. याचा अर्थ महाराष्ट्रातल्या जनतेची निव्वळ फसवणूक झाली आहे.

अशी फसवणूक किती काळ चालणार? असा संतप्त सवाल करत किरण काळे म्हणाले, हे कुठे तरी थांबायला हवे असे आमचे स्पष्ट मत आहे. त्यामुळेच आम्ही या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक यांच्या न्याय हक्कासाठी आपण छेडलेली ही लढाई महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाईल असा काळे यांनी व्यक्त केला आहे.

# नगरमध्ये प्रथमच ड्रोन प्रशिक्षण केंद्र सुरू; २० एप्रिलला कार्यशाळा




नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहिल्यानगर आणि सेरेब्रोस्पार्कइनोव्हेशन्स (ड्रोन उत्पादन आणि ड्रोन सोल्यूशन प्रदान करणारी कंपनी) यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगरशहरामध्ये प्रथमच ड्रोन प्रशिक्षण केंद्र सुरू होत आहे. त्यासाठी अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूल, विश्रामबाग, माळीवाडा येथे २० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. नगरमधील सर्व दहावी पास व १८ वर्षे पूर्ण असणारे विद्यार्थी हे प्रशिक्षण घेऊ शकणार आहेत. एक दिवसीय कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षणामध्ये होणाऱ्या सर्व बाबींचे मार्गदर्शन केले जाणार आहे. सदरची कार्यशाळा विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. नगरकरांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

अ.ए.सोसायटीने नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रमांना विशेष स्थान दिले आहे, त्यामुळे संस्थेच्या प्रत्येक शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी नगरकर विशेष प्राधान्य देतात. या नाविन्यपूर्ण उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्याला आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळेल व भविष्यात त्याला स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यास प्रेरणा मिळेल, असे त्याला मार्गदर्शन दिले जाणार आहे. त्याचबरोबर प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थ्यास ड्रोन दुरुस्ती व ड्रोन निर्मिती बाबत तज्ज्ञ प्राध्यापकांच्या माध्यमातून मार्गदर्शन दिले जाणार आहे.

**तुम्ही काय शिकाल :** ड्रोन काय आहेत आणि ते कसे कार्य करते?, ड्रोनचे भाग (फ्रेम, मोटर्स, बॅटरी इ.), ड्रोन उडवण्याचे नियम (DGCA मार्गदर्शक तत्त्वे), मूलभूत दुरुस्ती आणि काळजी, ड्रोन वापरून पैसे कसे कमवायचे किंवा व्यवसाय कसा सुरू करायचा?

**कोण सामील होऊ शकते? :** विद्यार्थी, शेतकरी, नोकरी शोधणारे, छंद असणारे, ड्रोनबद्दल कोणाला उत्सुकता आहे! असे सर्वजण प्रशिक्षण घेऊ शकतात, असे प्रतिपादन संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले. त्यावेळी उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी हे उपस्थित होते.

# नगररचना विभागाच्या बोगस व निष्क्रिय कारभाराचा माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरण कामास फटका

**अहिल्यानगर महानगरपालिकेने दोन दिवसात एनओसी न दिल्यास तीव्र आंदोलन करणार : गणेश भोसले यांचा इशारा**



माळीवाडा बसस्थानकामध्ये प्रवाशांना उन्हातान्हात बसची वाट बघत उभे राहावे लागत आहे.

नगर – गेल्या अनेक महिन्यांपासून नूतनीकरणाचे काम मनपाच्या उदानसीतेमुळे रखडले आहे. केवळ नगररचना विभागाच्या एका एनओसीसाठी माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरणास दिरंगाई होत आहे. याचा फटका सर्वसामान्य प्रवासी, नागरिकांना बसत असून दररोज त्यांना बसची वाट बघत उन्हातान्हात उभे राहावे लागत आहे, याला महानगरपालिकेचा ढिसाळ व निष्क्रिय कारभार जबाबदार आहे. नगररचना विभागातून दोन दोन महिने फाईल पुढे सरकत नाही; साधी एनओसी अधिकाऱ्यांना देता येत नाही, हा अत्यंत निंदनीय व अक्षम्य प्रकार आहे, असा संताप व्यक्त करत माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी जर मनपाने दोन दिवसात माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामास एनओसी न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

यावेळी काढलेल्या पत्रकात गणेश भोसले म्हणाले, अहिल्यानगर शहराचे आमदार अत्यंत तळमळीने व सतत पाठपुरावा करून नगर शहराच्या विकासासाठी कोट्यवधींची विकास निधी मंजूर करून आणत आहेत. मात्र महानगरपालिकेच्या प्रशासनाला व अधिकाऱ्यांना या विकासकामांशी काहीही देणेघेणे नाही. आ. संग्राम जगताप यांनी सामान्य प्रवासी नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांच्या सोयीसाठी माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी तब्बल साडेसोळा कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारकडे अथक परिश्रमाने पाठपुरावा करून मंजूर करून आणला आहे.

माळीवाडा बसस्थानकाच्या इमारतीच्या नूतनीकरण निधी मंजूर झाल्याने बसस्थानकाची जुनी इमारत पाडण्यात आली असून, नव्या इमारतीच्या कामास त्वरित सुरवात करण्यात येणार होती. मात्र महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या उदासिनतेमुळे व नगररचना विभागाच्या बोगस आणि निष्क्रिय कारभारामुळे माळीवाडा बसस्थानकाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले आहे. त्यामुळे जनतेच्या विकासाच्या अपेक्षांवर आणि आमदारांच्या अथक मेहनतीवर असे पाणी फिरवणे योग्य आहे का? महानगरपालिकेची यंत्रणा जर अशीच चालणार असेल, तर मग विकासाच्या नावाखाली जनतेला आम्ही काय उत्तर द्यायचे? मनापाच्या नगररचना विभागातील बोगस कारभार योग्य आहे का? काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणे कितपत योग्य आहे? असे सवाल गणेश भोसले यांनी मनपा आयुक्तांना विचारले आहेत.

माळीवाडा बसस्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामास मनपाने दोन दिवसात एनओसी न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा माजी महापौरांनी गणेश भोसले यांनी दिला आहे.



अरुणकाकांच्या आरोग्यासाठी तृतीयपंथी समाजाच्यावतीने सबजेल चौक येथील श्री तुळजापूर देवी मंदिर येथे महाआरती करण्यात आले.

# माजी आमदार अरुणकाकांच्या आरोग्यासाठी तृतीयपंथी समाजाची महाआरती, देवीला साकडे

नगर – सबजेल चौक येथील श्री तुळजापूर देवी मंदिर येथे तृतीयपंथी समाजाच्या वतीने माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी मंदिरात महाआरती करुन काकांच्या दिर्घायुष्यासाठी पदर पुढे घेऊन प्रार्थना करण्यात आली.

याप्रसंगी तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु, लैला शेख, मुस्कान शेख, अमृता गायकवाड, छकुली, सना, साधना, बिपाशा, गौरी, अक्षदा, दिया, शिवन्या, मॉन्टी, मोहिनी, पायल, गुत्ती, मीनाक्षी, शकुंतला आदीसह तृतीयपंथी उपस्थित होते.

श्री तुळजापूर देवी मंदिरात अरुणकाकांना चांगले आरोग्य लाभावे आणि त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी सर्व तृतीयपंथी समाजाच्या वतीने मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

काजल गुरु म्हणाले की, अरुणकाका हे सर्व नगरकरांचे भूषण आहे. त्यांची प्रकृतीसाठी सर्व समाजातील जाती–धर्माचे लोक प्रार्थना करत आहे. अरुणकाका यांनी आपल्या कार्यातून सर्वांच्या मनात एक आपुलकीचे स्थान निर्माण केले आहे. सर्वसामान्यांना आधार देवून त्यांनी अनेकांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले. व तृतीयपंथी यांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. त्यांचे स्वास्थ्य चांगले होण्यासाठी देविला साकडे घालण्यात आले आहे. ते लवकर बरे होवून आपल्या सोबत पुन्हा सामाजिक कार्यासाठी रुजू होतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# माजी आमदार अरुण जगताप यांच्या दीर्घायुष्यासाठी सर्वांनी प्रार्थना करावी

**गणेश भोसले यांचे आवाहन**



माजी आमदार अरुण जगताप यांना स्वास्थ्य मिळण्यासाठी मायंबा गडावर मच्छिंद्रनाथांच्या समाधीची महाआरती करून भाविकांना आराध्य जगताप याच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यता आले. यावेळी गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, सुनिल भोसले, योगेश दाणी, विजय फुलसैंदर, सोनु भोसले, हर्षल अग्रवाल, छोटु पांडुळे, आबा भोसले आदींसह कार्यकर्ते. (छाया – लहू दळवी)

नगर – सर्वांसाठी आदरणीय स्थान असलेले माजी आमदार अरुणकाका जगताप हे सध्या आजाराशी झुंज देत आहेत. त्यांना लवकरात लवकर बरे वाटून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी सर्वांनी आपापल्यापरीने मंदिरात, मस्जिदमध्ये, चर्चमध्ये व गुरुद्वारामध्ये प्रार्थना करावी, असे आवाहन माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केले.

अरुण जगताप यांना स्वास्थ्य मिळण्यासाठी सोमवारी सावरगाव येथे मायंबा गडावर मच्छिंद्रनाथांच्या समाधीची महाआरती करून प्रार्थना करण्यात आली. तसेच अरुण जगताप यांची नात कु.परमेश्वरी जगताप व नातू आराध्य जगताप यांच्या हस्ते उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यता आले.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुनिल भोसले, योगेश दाणी, विजय फुलसैंदर, सोनु भोसले, हर्षल अग्रवाल, छोटु पांडुळे, आबा भोसले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

विजय फुलसैंदर म्हणाले, सर्वांचे लाडके असलेले अरुणकाका यांच्यासाठी सर्व जातीधर्माचे नागरिक एकत्र येत प्रार्थना करत आहेत. लाखो भाविकांचे श्रद्धा स्थान असलेल्या मच्छिंद्रनाथांची महाआरती करून प्रर्थना केली आहे. बाबांच्या आशीर्वादाने नक्कीच अरुणकाकांना बरे वाटेल, ही खात्री आहे.

यावेळी सुनिल फुलसौंदर, धनंजय भोसले, वैभव वाघ, विशाल मदने, हर्षद वाल्हेकर, राहुल रासकर, गणेश दातीर, संतोष जाधव, बाळु खर्से, वैभव लांडगे, अदित काळे, पार्थ बोस, केतन पुंड, अंकित मोरे, विशाल सुपेकर आदी उपस्थित होते.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीसाठी गरजू आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीसाठी स्नेहालयाच्या विद्यार्थ्यांकडून प्रार्थना

**विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन**


नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी स्नेहालय संस्थेतील विद्यार्थ्यांकडून विशेष प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन संकल्पपूर्वक सदिच्छा व्यक्त केल्या आणि त्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली. या प्रार्थना सभेमध्ये विविध वयोगटातील विद्यार्थी सहभागी झाले होते. संस्थेतील शिक्षक, सेवक आणि पदाधिकाऱ्यांनी देखील या वेळी प्रकृतीसाठी सदिच्छा दिल्या. प्रार्थनेनंतर संस्थेच्या वतीने गरजू आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २४ एप्रिल २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १८ एप्रिल रोजी मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे १८ एप्रिल रोजी स्त्रीरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गर्भवती महिला आरोग्य तपासणी व उपचार मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या महिलांवर सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ व फिटल मेडिसीन तज्ज्ञ डॉ.हिरल चौधरी (गुजराथी) व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.सोनल बोरुडे तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. शिबिरात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपयांच्या पॅकेजमध्ये, सिझेरियन १० हजार रुपयात केले जाईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनाग्राफी, रक्त, लघवी इ. तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. शिबिरापासून पुढील १ महिन्यापर्यंत या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. तसेच शिबिरात सहभागी होणाऱ्या मातांना बाळंतपणावेळी बिलामध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल. यासाठी सवलतीच्या कार्ड असणे आवश्यक आहे.

हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटीस्कॅन १२५० रुपये, एम.आर.आय. २५०० रुपयात उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक सेवाही २४ तास उपलब्ध आहे. तसेच महावीर भवन येथे रूग्ण व रूग्णांच्या नातेवाईकांसाठी अल्प दरात निवास व्यवस्था व ३५ रूपयांत भोजन व्यवस्था आहे.

या शिबिराचा महिला रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – ०२४१–२३२०४७३/७

## कामगारांना नोंदणी करण्याचे आवाहन

नगर – कामगार व रोजगार मंत्रालय व राज्य सरकारच्या सहकार्याने ७ ते १७ एप्रिल दरम्यान कामगारांसाठी विशेष नोंदणी मोहिम राबविण्यात येत असून गिग व प्लॅटफॉर्म कामगारांनी ई श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन बीडी कामगार दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी केले आहे.

आयुष्यमान भारत, प्रधानमंत्रीजनआरोग्ययोजनेंतर्गत व्यापक स्वरुपात आरोग्यविमा प्रदान करण्याच्यादृष्टीने हे अभियान राबविण्यात येत असून शेअरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे मेझॉन, झोमॅटो यासारख्या ऑनलाईन सेवा देणाऱ्या कामगारांनी https://register.eshram.gov.in या पोर्टलवर नोंदणी करावी, असेही कळविण्यात आले आहे.

